आजचा दिनविशेष
२००८ : गुगलने त्याचा गुगल क्रोम वेब ब्राउझर लाँच केला

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार २ सप्टेंबर २०२५ | अंक २५३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# मनोज जरांगे पाटील छगन भुजबळांवर भडकले, तो इशारा देताच ठणकावून सांगितलं

## मी भुजबळ यांना ग्राह्यच धरत नाही

जरांगे यांच्या आंदोलनाला विरोध करणाऱ्या याचिकांवर सुनावणी झाल्यानंतर जरांगे यांनी आझाद मैदानावरील मराठा आंदोलकांना संबोधित केले तसेच माध्यम प्रतिनिधींना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं दिली. यावेळी पत्रकारांनी जरांगे यांना भुजबळ यांनी जाहीर केलेल्या भूमिकेवर प्रश्न विचारला. या प्रश्नाचे उत्तर देताना मी भुजबळ यांना ग्राह्यच धरत नाही. मराठा आणि कुणबी एकच आहेत. हे अंतिम सत्य असून यावर मी ठाम आहे. भुजबळ यांच्या बोलण्याला मी महत्त्व देत नाही, असा थेट हल्लाबोल जरांगे यांनी भुजबळ यांच्यावर केला

## मला जातीला जिंकून द्यायचे आहे, त्यामुळे...

तसेच, आंदोलकांनी घालून दिलेले सर्व नियम मोडले आहेत, असा दावा महाधिवक्त्यांनी न्यायालयात केला होता. त्यांत आता जरांगे यांनी आंदोलकांना शांत राहण्याचे आवाहन केले. मुंबईचे रस्ते मोकळे करा. गाड्या रस्त्यावर लावू नका. मैदानावर नेऊन गाड्या लावा आणि जाऊन झोपा, असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले. तसेच मला माझ्या जातीला जिंकून द्यायचे आहे. त्यामुळे जातीची मान खाली झुकेल असं काहीही करू नका. तुमच्याकडून होत नसेल तर परत गावी जा, असे खडे बोल जरांगे यांनी मराठा तरुणांना सुनावले आहेत.





राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच पेटला आहे. समस्त मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्या, अशी मागणी जरांगे यांनी केली आहे. याच मागणीला घेऊन ते आझाद मैदानात उपोषण करत आहेत. दरम्यान, जरांगे यांच्या या मागणीनंतर आता ओबीसी संघटना तसेच ओबीसी समाजाचे नेते आक्रमक झाले आहेत. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नये. अन्यथा आम्ही लाखोंच्या संख्येने मुंबईत येऊ असा थेट इशारा मंत्री छगन भुजबळ यांनी दिला आहे. त्यांच्या या भूमिकेवर आता मनोज जरांगे यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. भुजबळ यांची भूमिका काय? दरम्यान, छगन भुजबळ यांनी ओबीसी नेत्यांची बैठक घेऊन सरकारला इशारा दिला आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देऊ नये. तसे झाल्यास आम्हीदेखील लाखोंच्या संख्येने मुंबईत येऊ, असे भुजबळ म्हणाले आहेत. तसेच त्यांनी आता प्रत्येक तालुक्यात, जिल्ह्यात आंदोलन केले जाईल

## शेतकऱ्यांनी रेशीम शेतीतून आर्थिक समृद्धी साधावी - इंजी शेळके जी.एम
## जिल्हा रेशीम कार्यालयाच्या वतीने रानमळा येथे रेशीम दिन साजरा

गेवराई : महाराष्ट्र शासनाने १ सप्टेंबर हा दिवस रेशीम दिन म्हणून घोषित केलेला असून, रेशीम उद्योगाचे महत्त्व अधोरेखित करणे आणि या उद्योगातील संधी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे हा याम ागचा उद्देश आहे. तरी रेशीम शेती उद्योगाद्वारे शेतकऱ्यांना शाश्वत तसेच अधिक उत्पादन मिळत असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी रेशीम लागवड करुन आपला विकास साधून रेशीम शेतीतून समृध्द व्हावे असे प्रतिपादन रेशीम विभागाचे तांत्रिक अधिकारी शेळके जी.एम.यांनी केले.

राज्यात सर्वत्र १ सप्टेंबर हा दिवस रेशीम दिन साजरा करण्यात येतो त्या अनुषंगाने रेशीम संचालनालय




नागपूर , जिल्हा रेशीम कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई तालुक्यातील रानमळा/भाटेपुरी येथे रेशीम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी रेशीम विभागाचे तांत्रिक अधिकारी श्री.शेळके जी.एम, क्षेत्र सहाय्यक श्री.सोनटक्के ए.एम, रोजगार सेवक गणेश मोरे, शेतकरी संतोष मुळक, रविंद्र सागडे , संदिप मुळक, अशोक वाघ , विकास निकम, शंकर अडाळे, मनोज सागडे, आक्रुद निकम, हनुमान मुळक ,बाळु जाधव, ज्ञानेश्वर कुंडकर सह आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना इंजी शेळके म्हणाले की, रेशीम दिनाच्या माध्यमातून उद्योगाला प्रोत्साहन देणे, शेतकऱ्यांना त्यातील संधींची माहिती देणे आणि या उद्योगाचे महत्त्व वाढवणे हा यामागचा उद्देश आहे. रेशीम दिनाच्या निमित्ताने रेशीम उद्योगाशी संबंधित कार्यक्रम, कार्यशाळा, आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात, जेणेकरुन शेतकरी या उद्योगाकडे अधिक सकारात्मक दृष्टीने पाहतील असेही शेवटी बोलताना त्यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमास रानमळा/ भाटेपुरी व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अमीर बाबा दर्गा चे अनेक वर्ष सेवाकरनारे खिरणा बाई चव्हाण याचे दु:खद निधन




चकलंबा प्रतिनिधी :- गेवराई तालुक्यातील चकलंबा येथील हजरत अमीर शहा कादरी दर्गा यांची सेवा करणारी खीरनाबाई यांचे दु:ख त निधन झाले त्यांनी वीस ते पंचवीस वर्ष दर्गा ची सेवा केली. त्या सर्वांच्या आत्या होत्या त्यांना सर्वजण फुफु असं मनत सर्वांशी मनमिळाऊ स्वभाव कधीही कुणाला वापस बोलत नसेल कधीही कुणाला रागवत नसत त्यांच्या जाण्याने चकल्यांब्यात परिसरात हळहळ व्यक्त होत आहेत.त्यांची निधनाची वार्ता समजताच अनेकांना धक्काच बसला त्यांच्या अंत्यविधीला मोठा जनसमुदाय उपस्थित होता त्यांच्या पश्चात दोन मुले सुना नातवंड असा त्यांचा परिवार आहे त्यांच्या दु:खात

## येवलवाडी येथे जय भगवान गणेश मंडळाचा अभिनव उपक्रम
## गणेशोत्सवात रक्तदान, डोळे तपासणी व रांगोळी स्पर्धेचे आयोजन

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यातील नागरगोजे (येवलवाडी) येथे यंदाचा गणेशोत्सव केवळ उत्सवपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकीची जाणीव जपणारा ठरला आहे. येथील जय भगवान गणेश मंडळाने प्रथमच विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करून ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले व मन जिंकले गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित रक्तदान शिबिरामध्ये गावातील तसेच परिसरातील युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. समाजासाठी थेट उपयोगी ठरणाऱ्या या कार्यात तरुणाईने उत्साहाने रक्तदान करून आपले योगदान नोंदवले. ग्रामस्थांच्या आरोग्याच्या दृष्टीने डोळे तपासणी शिबिर घेण्यात आले. शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. अनेक ज्येष्ठ नागरिक व महिलांनी आपल्या आरोग्याविषयी जागरूकता वाढवण्याची संधी साधली.तसेच गावातील महिला व विद्यार्थिनींसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. रंगांच्या उधळणीने गावाचे वातावरण अधिकच आनंदमय झाले. सहभागी महिलांनी विविध सामाजिक संदेश देणाऱ्या रांगोळ्यांद्वारे आपली कला सादर केली.सामाजिक उपक्रमांमुळे गणेशोत्सव अधिक उपयुक्त ठरला असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. फक्त सांस्कृतिक कार्यक्रमांपुरता उत्सव न ठेवता समाजहिताचा संदेश देण्याचे कार्य जय भगवान गणेश मंडळाने गणेशोत्सवातून समाजसेवेचा नवा आदर्श निर्माण केला आहे.





## बिलोली येथे नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या ओळखपत्रांचे वाटप

नांदेड जिल्हा प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : जिल्हा मराठी पत्रकार संघाने जिल्ह्यातील संघटनेच्या सदस्यांना ओळखपत्र देण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. त्याच श्रृंखलेअंतर्गत नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने आज दिनांक ३१ ऑगस्ट रोजी बिलोली येथे ओळखपत्र वाटप सोहळा पार पडला. बिलोली येथे शासकीय शासकीय विश्रामगृहात झालेल्या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे हे होते




तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अनिल कसबे, सरचिटणीस अनुराग पोवळे, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र कांबळे व तालुकाध्यक्ष दादाराव इंगळे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे यांनी पत्रकार संघाच्या सदस्यांसाठी ओळखपत्रांसह अन्य सुविधा देण्यासाठी आपण कटीबद्ध आहोत. संघटना मजबूत झाल्यानंतर समस्या सुट शकतात. त्यामुळे पत्रकारांनी एकजूट कायम ठेवावी, असे सांगितले. यावेळी कार्याध्यक्ष अनिल कसबे, सरचिटणीस अनुराग पोवळे, ज्येष्ठ पत्रकार अशोक दगडे, रत्नाकर जाधव, दादाराव इंगळे यांचेही समायोजित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र कांबळे यांनी केले. या ओळखपत्र वितरण सोहळ्यास बिलोली तालुक्यातील पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## हुतात्मा स्मारकाची होणार स्वच्छता आणि रंगरंगोटी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज



.आगामी १७ सप्टेंबर रोजी बीड शहरातील हुतात्मा स्मारकावर आयोजित कार्यक्रमाच्या पार्श्वभूम ीवर सोमवार दिनांक १ सप्टेंबर रोजी ज़िल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सूचनेनुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्मारकाची पाहणी केली . जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहम ान , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , तहसीलदार चंद्रकांत शेळके , नगरपरिषद मुख्याधिकारी शैलेश फडसे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता चंद्रकांत बोराडे यांनी स्थळाला भेट देऊन आवश्यक कामांची तपासणी केली .

यावेळी स्मारक परिसरातील स्वच्छता , रंगरंगोटी आणि व्यवस्थापन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली . नगरपरिषदेचे नगर अभियंता किरण देशमुख , मंडळ अधिकारी सचिन सानप , ग्राम महसूल अधिकारी शब्बीर शेख , स्वच्छता विभाग प्रमुख भागवत जाधव आणि स्वच्छता निरीक्षक आयुब शेख आदी अधिकारीही या पाहणीवेळी उपस्थित होते .

प्रशासनाने स्म ारक परिसर स्वच्छ , आकर्षक आणि सुव्यवस्थित ठेवण्याच्या सूचना दिल्या असून नागरिकांच्या सहभागातून हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी तयारी करण्यात येत आहे . १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमासाठी सर्व यंत्रणा सज्ज राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले .

## संवेदनशीलतेचे उत्तम उदाहरणं म्हणजेच समाजसेवक परशुराम भैय्या गुरखुदे

### द्वारकाधीश' मंडळाकडून मुंबईत 25 क्विंटल खिचडी वाटप

बीड दि.१ (प्रतिनिधी)- मराठा योद्धा आदरणीय मनोज दादा जरांगे पाटील मुंबई या ठिकाणी उपोषणाला बसले आहेत आणि त्यांना पाठिंबा म्हणून बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रभरातून मराठा बांधव मुंबईत दाखल झाले आहेत. पाठिंबा देणाऱ्या बांधवांची संख्या जास्त असल्या कारणाने अनेकांची गैरसोय होत आहे. अनेक बांधवाना पाणी, जेवण सुद्धा मिळत नाही. हे पाहता बीडमधील समाजसेवक, कायम सामाजिक कार्यात सक्रिय असणारे परशुराम भैय्या गुरखुदे यांनी मराठा बांधवांची होत असलेले हेळसांड बघून २५ क्विंटल खिचडी द्वारकाधीशच्या माध्यमातून वाटप करण्यात आलेली आहे. परशुराम भैय्या हे नेहमीच




सामाजिक कार्यात तत्पर असतात. कोरोनाच्या काळात देखील द्वारकाधीश ग्रुपच्या माध्यमातून त्यांनी अन्न साखळी निर्माण केली होती. दररोज शेकडो कुटुंबाना 'द्वारकाधीश'च्या मार्फत जेवण मिळायचे. मनाने दिलदार असणाऱ्या भैय्यांना "राजा सारखं मन, मना सारखा राजा" म्हणणं देखील चुकीचे ठरणार नाही. अडचणीत येणारा व्यक्ती कोणत्या जाती धर्माचा आहे हे कधी भैय्यांनी पहायलच नाही. आत्तापर्यंत अनेकांना मदतीचा हात भैय्यांनी दिला आहे. आणि यामुळेच भैय्यांवर आज पर्यंत कोणी आरोप प्रत्यारोप करू शकले नाही. राजकारणापासून कोसोदूर असणारा हा नेता मनाने संवेदनशील आहे इतरांच दु:ख म्हणजे आपलं दु:ख हे समजून आपले सामाजिक जिवन जगणारा हा नेता सर्वांना हवाहवासा वाटतो अगदी लहानापासून ते थोरमोठ्यापर्यंत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## धक्कादायक : देशातील 11 टक्के लोकांना आयुष्यभर कॅन्सरचा धोका, काय आहे कारण ?



जगभरातील कॅन्सर प्रकरणांवर नजर टाकली तर भारत देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या क्रमांकावर चीन आहे. या देशात लोकसंख्या अधिक असल्याने कॅन्सरची प्रकरणे देखील अधिक आढळत आहेत. इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सरचे ग्लोबोकॅनच्या 2022 च्या डेटानुसार भारतात कॅन्सरचे 14 लाख प्रकरणे समोर आले होते. तर 9 लाख लोकांचा कॅन्सरने मृत्यू झाला आहे. भारतात कॅन्सरची प्रकरणे का जास्त पाहूयात..

कॅन्सरची वाढती प्रकरणांना पाहून गेल्या काही दिवसांपूर्वी झालेल्या संशोधनात धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. 20 ऑगस्ट रोजी जावा नेटवर्कची अहवाल समोर आला आहे. त्यात भारताच्या दर दहाव्या व्यक्तीला कॅन्सर झाल्याचा अंदाज आहे.म्हणजे लोकसंख्येच्या 11 टक्के लोकांना या जीवघेण्या आजाराचा सामना करावा लागत आहे. National Cancer Registry Programme Investigator Group ने हे संशोधन केले आहे. या अभ्यासात सात लाखहून अधिक कॅन्सर प्रकरणाचे संशोधन केले गेले. यात 2 लाख अशा प्रकरणांचा अभ्यास केला ज्यात मृत्यू झाला आहे. हे आकडे पाहाता आता कॅन्सर केवळ एक समस्या नाही, तर एक मोठ्या प्रमाणात आव्हान बनले आहे.

कोणती राज्ये प्रभावित

मिझोरमची राजधानी आईझोल कॅन्सर बाबत सर्वाधिक प्रभावित आहे. येथे दर एक लाख पुरुषांमध्ये 256 पुरुषांना कॅन्सर आढळला आहे. तर एक लाख महिलांमागे 217 महिलांना कॅन्सर झालेला आहे.

पूर्वोत्तर भारतातील 6 जिल्ह्यात सर्वाधिक कॅन्सरची प्रकरणे आढळली आहेत. याशिवाय काश्मीर खोऱ्यात आणि केरळात देखील कन्सरचे प्रमाण सर्वाधिक आहे. हैदराबाद येथे दर एक लाख महिलांपैकी 154 महिला कॅन्सरच्या रुग्ण आहेत. ब्रेस्ट कॅन्सर आणि ओरल कॅन्सरचे सर्वाधिक प्रकरणे आहेत.

देशाच्या नॉर्थ ईस्टमध्ये दोन प्रकारचे कॅन्सर अधिक आढळत आहेत. पहिला आहे एसोफॅगल कॅन्सर, हा अन्न नलिकेतील कॅन्सर आहे. दुसरा पोटात होणार कॅन्सर. मोठ्या शहरात ब्रेस्च कॅन्सर आणि ओरल कॅन्सरची प्रकरणे अधिक आहेत. तर गावात सर्व्हायकल कॅन्सर अधिक आढळत आहेत.

दिल्लीची स्थिती चिंताजनक

राजधानी दिल्लीत प्रदुषण, बदललेली लाईफस्टाईल आणि खानपानची सवय आणि स्क्रीनिकची कमतरता यामुळे कॅन्सरचे प्रकरण वाढत आहेत. दिल्लीतील युवकांत ब्लड कॅन्सरच्या (Acute Myeloid Leukemia) केस वाढत आहेत.

3,000 नवीन प्रकरणं

अलिकडच्या वर्षात दिल्लीत ब्लड कॅन्सरचे सुमारे 3000 नवीन केस दाखल झाल्या आहेत. 30 ते 40 वयोगटातील लोकांमध्ये यांचे चिंताजनक प्रमाण आहे. कॅन्सर आता वृद्धांना नव्हे तर तुरुणांनाही लक्ष्य करत आहे. प्रदुषणामुळे फुप्फुसाचे कॅन्सरही वाढत आहे.

# परिवर्तनवादी चळवळीला बळ देणारी संघटना मराठा सेवा संघ

मराठा समाजातील मोजक्या समविचारी अधिकारी कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन क्रांतीपुरुष शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर साहेब यांनी ०१ सप्टेंबर १९९० रोजी मराठा सेवा संघाची स्थापना केली. काही मोजके अपवाद सोडले तर मराठा समाजाची तात्कालीन परिस्थिती बिकट आणि दयनीय होती. समाज विखुरलेला होता, समाजात अनेक पोटभेद होते. अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा यामध्ये अडकलेला होता. श्रीमंतीचे अनाठायी प्रदर्शन, अंधश्रद्धा – कर्मकांड, व्यसनाधीनता, गरज नसताना उधळपट्टी, चंगळवाद, यामुळे समाज कर्जबाजारी होत होता. महिलांमधील उपवास – तापास, व्रतवैकल्ये, अंधश्रद्धा, कर्मकांड आणि पुरुषांमधील व्यसनाधीनता व भावभावकीची भांडणे, ऋण काढून सण साजरे करणे या सगळ्या गोष्टींमुळे बहुसंख्य मराठा समाजाची आर्थिक स्थिती तेव्हाही हलाखीचीच होती आणि आताही हलाखीचीच आहे. समाजात मोठ्या प्रमाणात शिक्षणाविषयी अनास्था होती. या सगळ्या कारणांनी बहुसंख्य मराठा समाज शैक्षणिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास कधी झाला हे त्याच्याही लक्षात आले नाही. या सर्व विस्थापित, विखुरलेल्या मराठा समाजाला एकत्र केल्यास, समाजाचे प्रबोधन केल्यास, समाजाला परिवर्तनाच्या मार्गावर आणल्यास वंचित, शोषित, पीडित मराठा समाजाच्या विकासाला चालना मिळू शकते आणि या समाजाला चांगले दिवस येऊ शकतात असा सशक्त विचार खेडेकर साहेबांच्या डोक्यात जन्मला. त्यांनी तो समाजमनात रुजवला, वाढवला तो केवळ आणि केवळ समाजाप्रती असलेल्या कळवळ्यापोटी

लेंकराचें हित । वाहे माउलीचें चित्त ॥१॥
ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती ॥ध्रु.॥

या संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या संत वचनाप्रमाणेआईच्या मनात ज्याप्रमाणे आपल्या मुलाच्या हिताचा विचार असतो तसाच मराठा सेवा संघाच्या मागील ३५ वर्षाच्या वाटचालीमध्ये फक्त आणि फक्त समाजाच्या हिताचाच विचार आहे. समाज हिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी संघटना अशी मराठा सेवा संघाची ओळख आहे. कोणत्याही परिवर्तनवादी चळवळीचे व्यापक मानव कल्याण हेच अंतिम उद्दिष्ट असायला हवे आणि याच उद्दिष्टाला अनुसरून मराठा सेवा संघाने ३५ वर्ष काम केले आहे आणि आजही करत आहे.

मराठा सेवा संघाने समाजाला चाकोरीबद्ध जीवन मार्गावरून परिवर्तनाच्या नव्या जीवन मार्गावर आणले. परिवर्तनासाठी समाजाचे प्रबोधन केले. परिवर्तनशील जीवनाला सतत नाविन्याचा ध्यास असतो. ते नवनवीन संकल्पना, विचार, तत्वज्ञान यामुळे उन्नत होत जाते. याची जाणीव समाजाला करून दिली. स्थित्यंतराशिवाय गत्यंतर नाही आणि परिवर्तनाशिवाय जीवनात आनंद नाही, प्रगती नाही हे सांगणारी संघटना आणि नेतृत्व मराठा सेवा संघामुळे समाजाला मिळाले. त्यामुळे मराठा बहुजन समाजाला वैचारिक दिशा मिळाली आणि परिवर्तनाला गती मिळाली हे मराठा सेवा संघाचे यश आहे.

बेरोजगार मराठा तरुणांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्या. कुठलाही व्यवसाय हलका किंवा भारी नसतो त्यामुळे डोक्याच्या मालिशपासून ते बूट पॉलिशपर्यंत कुठलाही व्यवसाय करा आणि स्वाभिमानाने जगा हा मंत्र तरुणांना मराठा सेवा संघाने दिला. ज्या तरुणांच्या हातामध्ये दगड, लाठ्या, काठ्या आणि शस्त्र दिले जायचे व दंगली घडवल्या जायच्या, तरुणांना गुन्हेगार बनवून समाज विघातक कृत्य त्यांच्याकडून करून घेतल्या जायची त्या तरुणांच्या हातामध्ये वही, पुस्तक आणि लेखणी देऊन त्यांना रचनात्मक व सृजनशील मार्गावर आणून त्यांचे जीवन समृद्ध करणारी, त्यांच्यामध्ये कुटुंब, समाज व राष्ट्राप्रतीच्या जबाबदारीचे आत्मभान जागृत करणारी, तरुणांचे प्रबोधन करून त्यांच्या माध्यमातून केडरबेस विचारांचे इतिहास लेखक, अभ्यासक , संशोधक, प्रकाशक, वक्ते, कार्यकर्ते, शाहीर, कीर्तनकार, विचारवंत, कलागुणसंपन्न कलाकार, व्यापारी , उद्योजक, अधिकारी, कर्मचारी निर्माण करण्याचं काम मराठा सेवा संघाने केले. त्याचबरोबर धर्मसत्ता, राजसत्ता, अर्थसत्ता, शिक्षणसत्ता, प्रचार – प्रसार माध्यम सत्ता प्राप्त केल्याशिवाय समाजाचा सर्वांगीण विकास होणे अशक्य आहे. या पाच सत्ता ताब्यात घेण्याचं स्वप्न मराठा बहुजन समाजाच्या मेंदूमध्ये पेरण्याचं काम मराठा सेवा संघाने केलं आणि त्या क्षमता विकसित करण्यासाठी मराठा सेवा संघाने ३५ वर्ष प्रयत्न केले. मराठा सेवा संघाने जंगम संपत्तीपेक्षा बौद्धिक संपत्ती विकसित करण्यावर भर दिला आणि आज बौद्धिक संपत्तीने मराठा सेवा संघ ही संघटना सर्वात श्रीमंत संघटना आहे असं म्हटलं तर ते चुकीचं ठरणार नाही.

मराठामार्ग मासिक व शिवधर्म साप्ताहिकाने समाजमनाची मशागत केली. त्यासोबतच इतिहासाला लागलेले डाग पूसून काढले. स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले, राष्ट्रमाता राजमाता माँसाहेब जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांसह मराठा बहुजन समाजातील कर्तबगार महामानवांचा सत्य इतिहास लोकांपर्यंत पोहचवला. खोट्या इतिहासाच्या माध्यमातून चुकीची माहिती लोकांपर्यंत पोहोचवून प्रतिमा मलीन करण्याचा व लोकांचा बुद्धिभेद करण्याचा जो प्रयत्न अनेक वर्षांपासून सुरू होता त्याला पायबंद घालण्याचे काम मराठा सेवा संघाने केले. स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचा सत्य इतिहास समाजासमोर आणून तो तळागाळापर्यंत पोहोचवला. अनेक नाटक, चित्रपट, कथा, कादंबऱ्या, मालिका या माध्यमातून इतिहासाला डाग लावण्याचं काम मागील अनेक वर्षात झालं होता. ते डाग संशोधनातून सप्रमाण पुसून टाकण्याचे काम मराठा सेवा संघाने केले.

मराठा सेवा संघामुळे जातीय आणि धार्मिक दंगली जवळजवळ बंद झाल्या. धर्मा–धर्मामध्ये, जाती-जातीमध्ये द्वेष निर्माण करून दंगली घडवणाऱ्या वृत्तीला चाप बसला. त्यामुळे महाराष्ट्राच्या भाळी लागलेला दंगलीचा कलंक पुसला गेला. छत्रपती शिवाजी महाराज सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम करत होते. शिवरायांच्या स्वराज्य निर्मितीमध्ये सर्व जाती-धर्माच्या लोकांचे योगदान होते हे लोकांच्या लक्षात आले त्यामुळे शिवराय सर्वांचे आणि सर्व जाती धर्माचे लोक शिवरायांचे हा विचार समाज मनात रुजला. मुस्लिमांना देखील शिवराय आपले वाटायला लागले हे मराठा सेवा संघाच्या प्रबोधनाचे यश आहे. शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे व सर्वच वारकरी संत यांचे विचार प्रत्येक घरापर्यंत व घरातील प्रत्येक माणसापर्यंत पोहोचले. फुले शाहू आंबेडकर यांच्या प्रतिमा मराठा समाजाच्या घरापर्यंत आणि विचार मेंदूपर्यंत पोहोचले. त्याचप्रमाणे शिवरायांच्या प्रतिमा आणि त्यांचे विचार इतर जात धर्म समूहांच्या घरापर्यंत पोहोचले. वारकरी संत आणि महामानवांची मर्यादित आणि चुकीची ओळख पूसल्या गेली व खरेखुरे सर्वांना सोबत घेऊन चालणारे त्यांचे विचार आणि कार्य जनतेपर्यंत पोहोचले. सर्व जाती-धर्माच्या लोकांच्या लक्षात आले की आपला ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा एक आहे. आपण गुण्यागोविंदाने एकत्र राहू शकतो. परस्पर सहकार्य व सामंजस्याने शांततामय जीवन जगू शकतो प्रगती करू शकतो. सर्व जाती धर्मातील समविचारी परिवर्तनवादी चळवळींमध्ये व त्या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये सुसूत्रता आणण्याचे, सर्वांना एका विचारपीठावर आणण्याचे काम मराठा सेवा संघाने केले. त्यामुळे मराठा सेवा संघ सर्वांना आपलासा वाटतो, जवळचा वाटतो.

मराठा सेवा संघ ही जगातली एकमेव संघटना आहे जी एका कर्तबगार स्त्रीच्या नावाने अभिवादन करते. जिजाऊंना प्रेरणा, ऊर्जा आणि शक्ती मानते. त्याचबरोबर जिजाऊ, अहिल्या, सावित्री, रमाई यांसह बहुजन समाजातील कर्तबगार स्त्रीशक्तीचा इतिहास समाजापर्यंत, महिला, मुलींपर्यंत पोहोचवला. त्यामुळे महिला मुली शिकु लागल्या, धाडसाने पुढे येऊ लागल्या, लिहू, बोलू लागल्या. इतिहास संशोधक, लेखक, अभ्यासक, व्याख्यात्या, शाहीर, कीर्तनकार, कलागुणसंपन्न कलाकार म्हणून समाजामध्ये नावारूपाला आल्या व समाजाचे प्रबोधन करू लागल्या. महिलांचे धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक , शैक्षणिक विश्व ढवळून निघाले हे मराठा सेवा संघाच्या प्रयत्नांचे यश आहे.

मराठा सेवा संघाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मतारखेचा अनेक वर्षे चाललेला वाद थांबवला. १९ फेब्रुवारी १६३० ही छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मतारीख सप्रमाण सिद्ध केली. जिजाऊंची अधिकृत प्रतिमा तयार केली. मुंबईत मंत्रालयात जिजाऊंचे तैलचित्र लावले. जिजाऊंचे चित्र आणि चरित्र घराघरात आणि जगभरात पोहोचवले. जिजाऊ वंदना घराघरात आणि जगभरात पोहोचली. मराठा सेवा संघाने मातृतिर्थ सिंदखेडराजा येथे सुरू केलेला जिजाऊंचा जन्मोत्सव सोहळा लोकोत्सव झाला. सिंदखेड राजाचे ऐतिहासिक महत्त्व जगभरात पोहोचले. शेकडो एकर मध्ये जिजाऊसृष्टीसारखा विशाल व महत्त्वकांक्षी प्रकल्प उभा राहिला. जगभरातून लोक स्वखर्चाने तेथे येऊ लागले. मातृतीर्थ सिंदखेडराजा हे कोट्यावधी मराठा बहुजन समाजाचे प्रेरणास्थान झाले. दरवर्षी कोट्यावधी रुपयाची पुस्तके त्याठिकाणी विकली जाऊ लागली. ०३ जानेवारी ते १२ जानेवारी सावित्री ते जिजाऊ दशरात्रोत्सवाच्या माध्यमातून प्रबोधनाचे, परिवर्तनाचे, विचारांचे सोहळे सजू लागले ते मराठा सेवा संघामुळे. त्याचबरोबर शिवजन्मोत्सव सोहळा, शंभू जन्मोत्सव सोहळा, शिवराज्याभिषेकदिन सोहळा असे विचारांचे व प्रबोधनाचे सोहळे सजवण्यामध्ये, जय जिजाऊ जय शिवराय एक मराठा लाख मराठा अशा परवलीच्या घोषणा समाजात रुजवण्यामध्ये मराठा सेवा संघाची भूमिका महत्त्वाची आहे.

मराठा सेवा संघाच्या वैचारिक प्रबोधनाच्या, परिवर्तनाच्या चळवळीमुळे मराठा बहुजन समाजाच्या घरातील नवस – सायास, व्रतवैकल्य, अंधश्रद्धा, कर्मकांडे बऱ्याच प्रमाणात कमी झाली, त्यातून होणारा पैशाचा अपव्यय बऱ्यापैकी थांबला. अज्ञानाकडून ज्ञानाकडे आणि ज्ञानाकडून विज्ञानाकडे असा प्रवास सुरू झाला. मराठा बहुजन समाज वाचायला लागला, विचार करायला लागला, चिकित्सा करायला लागला. प्रत्येक गोष्ट बुद्धीच्या कसोटीवर घासुन आणि तपासूनच स्वीकारायची या मानसिकतेपर्यंत येऊन पोहोचला. खुळचट कल्पना, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, चालीरीती, भाकडकथा, चुकीच्या समजुती यापासून दूर जाऊ लागला तो मराठा सेवा संघामुळे.

मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे ही प्रथम मागणी करणारी संघटना म्हणजे मराठा सेवा संघ. सुरुवातीच्या काळामध्ये मराठा सेवा संघाला मराठा समाजाच्या विरोधाला, रोषाला सामोरे जावे लागले. मराठा सेवा संघ आम्हाला मागास बनवत आहे अशी आवई उठविणाऱ्या मराठ्यांना आता काळाच्या ओघात मराठा सेवा संघाची तेंव्हाची भूमिका व मागणी योग्य होती याची प्रचिती आली आहे. त्यासाठी मराठा सेवा संघाने सलग ३५ वर्ष अखंडितपणे, अथकपणे प्रयत्न केले. अनेक मेळावे, आंदोलने, मोर्चे, सभा, संमेलने यातून लोकांचे प्रबोधन केले. आज आपण पाहतोय की महाराष्ट्रातील संपूर्ण मराठा समाज आम्ही कुणबी आहोत आणि आम्हाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली एक झाला आहे हे मराठा सेवा संघाच्या वैचारिक प्रबोधनाचे यश आहे.

मराठा सेवा संघाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात मराठा मुला मुलींसाठी विद्यार्थी वस्तीगृहे उभी राहिली आहेत, बळीराजा संशोधन संस्था उभी राहिली. मराठा सेवा संघाच्या प्रेरणेतून अनेक सहकारी संस्था, बँका, पतसंस्था, औद्योगिक प्रतिष्ठाने, सामाजिक संस्था, सांस्कृतिक संस्था, शैक्षणिक संस्था निर्माण झाल्या व समाजाच्या उन्नती मध्ये आपले योगदान देऊ लागल्या.

मराठा बहुजनांचे मन मेंदू आणि मनगट सशक्त करणारी संघटना, रचनात्मक, सृजनात्मक कार्यावर भर देणारी संघटना म्हणजे मराठा सेवा संघ अशी या संघटनेची ओळख निर्माण झाली. मराठा सेवा संघामुळे कित्येकांच्या आयुष्याचं सोनं झालं. वारकरी संत आणि बहुजन महामानवांनी सुरू केलेल्या प्रबोधनाच्या, परिवर्तनाच्या चळवळीला बळ मिळालं. ज्या संघटनेसमोर आकाश ठेंगणं वाटावं अशी संघटना म्हणजे मराठा सेवा संघ. केवळ प्रतिक्रियावादापेक्षा क्रियावादाला अधिक प्राधान्य देणारी संघटना म्हणजे मराठा सेवा संघ.

जगाला फुलांनी फळांनी लगडलेला भव्य आणि सुंदर वृक्ष दिसतो पण जमिनीखाली गाडून घेतलेली त्याची बी कधीच दिसत नाही. त्या बी ने स्वतःला गाडून घेतलेलं असतं म्हणूनच त्या वृक्षाची भव्यता आणि फुलं फळं लोकांच्या नजरेत भरतात. जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात एका बिजा केला नासं मग भोगीले कणीस संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या या संतवचनाप्रमाणे चांगले उदात्त कार्य जेव्हा समोर दिसते तेव्हा त्यासाठी त्या व्यक्तीने, समूहाने , संस्थेने घेतलेले अपार कष्ट मात्र दिसून येत नाहीत. आज मराठा सेवा संघाचे जे विशाल रूप आपल्या दृष्टीस पडत आहे त्यामागे संस्थापक अध्यक्ष शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर साहेब, प्रा. मा. म. देशमुख, डॉ. आ. ह. साळुंखे, चंद्रशेखर शिखरे, प्रविण गायकवाड, गंगाधर बनबरे, श्रीमंत कोकाटे, प्रदिप सोळुंके यांच्यासह साहेबांच्या खांद्याला खांदा लावून आजपर्यंत काम करणारे त्यांचे सर्व सहकारी या सर्वांच्या असीम त्यागाचे फळ म्हणजे मराठा सेवा संघ होय.

आज मराठा सेवा संघ व्यक्ती, समूह किंवा संस्था एवढ्यापुरता मर्यादित राहिलेला नसून तो एक विचार झालेला आहे. जो विचार जगभरात पोहोचला आहे. व्यक्ती, समूह, संस्था यांना काळाची मर्यादा असते. ते येतात आणि जातात पण विचार मात्र कायम राहतात. उद्या मराठा सेवा संघात काम करणाऱ्या व्यक्ती असतील नसतील, समूह असतील नसतील, संस्था असतील नसतील परंतु हा विचार मात्र चंद्र सूर्य आहे तोपर्यंत आणि त्यानंतरही कायम राहील. असा चिरंतन विचार देणाऱ्या मराठा सेवा संघाला आणि सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांना, सर्व मराठा बहुजन समाज बांधवांना वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

ह भ प संतोष महाराज डोंगरे
जिल्हाध्यक्ष
मराठा सेवा संघ प्रणित संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष बीड

# गौरी गणपती, ईद निमित्त कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पो.नि.राहुल सूर्यतळ यांच्या नेतृत्वाखाली पथसंचलन

माजलगाव-प्रतिनिधी सध्या सुरू असलेल्या गौरी गणपती ईद-ए-मिलाद या हिंदू मुस्लिम बांधवांच्या सणानिमित्त माजलगावात कायदा आणि सुव्यवस्था व्यवस्थित रहावी व समाजाचे मानसिक आरोग्य सुव्यवस्थित रहावी यासाठी माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्य तळे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील संपूर्ण प्रमुख रस्त्यावरून पथसंचलन करण्यात आले या पथसंचलनामध्ये पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी बीड जिल्हा पोलीस दलाचे महिला पोलीस कर्मचारी यांच्या शिस्तबद्ध पद्धतीने मार्गक्रमण करीत असताना शहर पोलीस ठाण्यामधून शहरातील प्रमुख मार्गावरून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे छत्रपती संभाजी महाराज चौक व पुन्हा त्याच मार्गावरून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक चुन्नू चौक हनुमान चौक मस्जिद चौक झेंडा चौक पाटील गल्ली या मार्गावरून पोलिसांनी अत्यंत शिस्तबद्धपणे तैनात होऊन शहराच्या मुख्य रस्त्यावरून पथसंचलन करीत सुरुवात केली. गौरी गणपती गणेशोत्सव ईद ए-मिलाद या हिंदू व मुस्लिम बांधवांच्या पवित्र सणानिमित्त कायदा व सुव्यवस्था व चोख बंदोबस्त ठेवण्यासाठी या पतसंचलनातून संदेश देण्यात आला याप्रसंगी सहाय्यक पोलीस निरीक्षक मुंडे पीएसआय माकने यांच्यासह बीड



पोलीस दलातील जवान गृहरक्षक दलाचे जवान महिला पोलीस कर्मचारी या पथसंचलनात सहभागी झाले होते याप्रसंगी शांतता प्रेमी जनतेने ठीक ठिकाणी पोलिसांच स्वागत केले याप्रसंगी पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ म्हणाले की गणेशोत्सव ईद-ए-मिलाद हे दोन्ही सण मोठ्या उत्साहात पण शांततेत पार पडावी यासाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था हातात न घेता प्रशासनाला सहकार्य करावे शहरात या संचलनांमुळे एक वेगळच शिस्तबद्ध आणि आनंददायी वातावरण दिसत आह

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार २ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# साखर खाल्ल्यामुळे केस लवकर पांढरे होतात का?



वाढत्या वयानुसार केस पांढरे होणे स्वाभाविक आहे, परंतु चुकीच्या जीवनशैलीमुळे तरुणांनाही केस पांढरे होण्याची समस्या भेडसावत आहे. सूर्यप्रकाश, प्रदूषण, वाईट खाणे-पिणे, ताणतणाव, थायरॉईडसह, प्रथिनांची कमतरता, अशक्तपणा आणि अनुवांशिक विकार यामुळे देखील कमी वयात केस पांढरे होतात. अशा परिस्थितीत, तुमच्या खाण्यापिण्यात काही बदल करून ही समस्या कमी करता येते. पण तुम्हाला माहिती आहे का की जास्त गोड पदार्थ खाल्ल्याने केस अकाली पांढरे होऊ शकतात? हो, साखर केस पांढरे होण्याचे प्रमाण वाढवते. कारण साखरेचा वयस्कर परिणाम होतो, ज्यामुळे लहान वयातच केस पांढरे होऊ लागतात. हे का घडते? चला जाणून घेऊया.

गाझियाबादमधील मॅक्स हॉस्पिटलमधील त्वचारोगतज्ज्ञ डॉ. सौम्या सचदेवा म्हणतात की गोड पदार्थ खाण्याचा केस पांढरे होण्याशी थेट संबंध नाही. तथापि, दररोज साखरेचे जास्त सेवन केल्याने शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढते. यामुळे रक्तातील साखरेमध्ये वारंवार चढ-उतार होऊ शकतात. ज्यामुळे केसांच्या मुळांवर आणि मेलेनिनच्या उत्पादनावरही परिणाम होऊ शकतो. मेलेनिन हे एक रंगद्रव्य आहे जे केसांना काळे किंवा तपकिरी ठेवते. जर मेलेनिनचे उत्पादन कमी झाले तर केस पांढरे होऊ लागतात.

जास्त साखर खाल्ल्याने शरीरात मुक्त रॅडिकल्स वाढतात. मुक्त रॅडिकल्स केसांच्या मुळांना नुकसान करतात ज्यामुळे केसांचे कूप कमकुवत होतात. ज्यामुळे केस तुटू लागतात आणि अकाली पांढरे होतात. मुक्त रॅडिकल्स हे आपल्या शरीरात तयार होणारे अस्थिर रेणू असतात. त्यांच्यात कधीकधी इलेक्ट्रॉनची कमतरता किंवा जास्तता असते, ज्यामुळे ते स्वतःचे संतुलन राखण्यासाठी शरीराच्या निरोगी पेशींमधून इलेक्ट्रॉन हिसकावून घेतात. हेच कारण आहे की ते केसांच्या मुळांना नुकसान करतात. वाढत्या ताणतणावामुळे लोक जास्त गोड पदार्थ खाऊ लागतात. शरीराला गोड पदार्थांची तीव्र इच्छा होते. गोड पदार्थ खाल्ल्यानंतर शरीराला काही काळ बरे वाटते पण दीर्घकाळात ते हार्मोन्सचे असंतुलन बिघडू लागते. हार्मोनल बदलांमुळे केसही लवकर पांढरे होतात.

खूप गोड नाश्ता आणि सॉफ्ट ड्रिंक्सपासून दूर रहा. तुमच्या आहारात फळे, भाज्या, काजू आणि बिया यांचा समावेश करा.ताण कमी करण्यासाठी योग आणि ध्यान करा.शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडत राहावेत म्हणून पुरेसे पाणी प्या.केसांची काळजी घेण्यासाठी, लोह, व्हिटॅमिन बी १२ आणि प्रथिनेयुक्त पदार्थ खा.

जास्त गोड पदार्थ खाल्ल्याने केसांची मुळे कमकुवत होतात, मेलेनिन कमी तयार होते आणि केस पांढरे होऊ लागतात. म्हणून जर तुम्हाला तुमचे केस दीर्घकाळ काळे आणि निरोगी ठेवायचे असतील तर मर्यादित प्रमाणात गोड पदार्थ खा आणि संतुलित आहार घ्या.

# माजलगाव नगरपरिषद तर्फे मालमत्ता कर सक्तिची वसुली तात्काळ बंद करा नसता तीव्र आंदोलन -शेख रशिद

## सामान्य नागरिकांना कर्मचारी देत आहे नळ कनेक्शन बंद करण्याचे धमक्या

माजलगाव - माजलगाव नगरपरिषद प्रशासनाने मालमत्ता कर सक्तीची वसुली सुरू करण्यात आली आहे.माजलगांवकरांना नगरपरिषद तर्फे कोणतीही मुलभूत सुविधा उपलब्ध करून देत नाही.स्वच्छता,पाणीपुरवठा योजनाचे तीनतेरा वाजलेले आहे तसेच प्रत्येक प्रभागात विकासकामे बोगस होत असुन अधिकारी, कर्मचारींवर कोणत्याही प्रकारची धाक राहिलेला नाही.माजलगांव नगरपरिषद मध्ये सामान्य नागरिकांचे कामे होत नाहीत तसेच खुलेआम पैसे मागुन भ्रष्टाचार वाढलेला आहे. सर्वसामान्य नागरिकांना सध्या मालमत्ता कर भरा नसता तुमच्या नळ कनेक्शन बंद करण्यात येईल अशी धमकी माजलगाव नगरपरिषद चे अधिकारी व कर्मचारी देत आहेत त्यामुळे मालमत्ता कर सक्तिची वसुली तात्काळ बंद करा नसता लोकशाही मार्गाने तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी दिला आहे.

माजलगाव नगरपरिषद प्रशासनाने सन २०१७-१८ हया वर्षात ई-टेंडर प्रक्रिया अवलंबून ठराव पास करुन कोअर प्रोजेक्ट इंजि अँड कन्सल्टन्सी प्रा.लि. अमरावती हया टेंडरला मालमत्ता कर दरनुसार १) प्रति मालमत्ता रु.५४९, २) प्रति मोळकी जागा रु.४८०, ३) देखभाल वार्षिक प्रती मालमत्ता रु ९२ व४) ईतरबाबी दरपत्रकानुसार देण्यात आले होते पण शिक्षण कर, वृक्ष कर, नलपट्टी कर, घरपट्टी कर पाणीपुरवठा कर अश्या वेगवेगळ्या कर भरणा करुन नोटीस बजावण्यात आले असुन ह्यामुळे सामान्य नागरिक त्रस्त झाला असुन मालमत्ता टेंडर रद्द करावे अशी मागणी शेख रशिद यांनी केली आहे. माजलगांव शहरात सामान्य नागरिकांवर मालमत्ता करच्या नावावर नियम अटी धाब्यावर बसवून लुटण्याचा काम नगरपरिषद प्रशासन करत असुन मालमत्ता कर, पाणीपुरवठा कर, नलपट्टी, घरपट्टी अशी वेगवेगळी कर लावुन पैसे भरा नसता आपल्या घरतील नळ कनेक्शन बंद करण्यात येईल अश्या प्रकारे माजलगाव नगरपरिषद चे अधिकारी व कर्मचारी सक्तिने वसुली करण्यात येत आहे त्यामुळे मुख्याधिकारी साहेब ताल्काळ वसुली बंद करा नसता तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी केला आहे.

# नागरिकांनी गणेशोत्सव मोठ्या आनंदात व शांततेत साजरा करा - पो. नि. अशोक मुदिराज

## पो. नि. अशोक मुदिराज हस्ते लोकशाही पत्रकार संघाच्या 'श्री' ची आरती संपन्न

बीड दि.२८(प्रतिनिधी)- गणेशोत्सव आनंदात आणि शांततेत साजरा करण्याची हिंदू संस्कृती आहे त्या हिंदू संस्कृतीला अनुसरून बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी गौरी गणपती सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करावा असे आवाहन पेठ बीड पोलीस स्टेशन पो. नि. अशोक मुदिराज यांनी लोकशाही पत्रकार संघाचा धानोरा रोडचा राजा गणेश मंडळाच्या येथे 'श्री' च्या आरतीच्या निमित्ताने केले.

प्रति वर्षी प्रमाणे याही वर्षी लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने धानोरा रोड परिसरात लाडक्या गणरायाची स्थापना करण्यात आली. स्थापनेच्या दुसऱ्या दिवशी सकाळची आरती लोकशाही



पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य व जिल्हाध्यक्ष साहस आदोडे यांच्या शुभहस्ते करण्यात आली. सायंकाळची आरतीसाठी पेठ बीड पोलीस स्टेशन चे पो. नि. अशोक मुदिराज आणि समाज कल्याण अधिकारी मेश्राम मॅडम यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्या नंतर सायंकाळी सातच्या सुमारास पो. नि. अशोक मुदिराज आणि मेश्राम मॅडम यांच्या शुभहस्ते श्रींची आरती करण्यात आली. आरती संपन्न झाल्यानंतर अशोक मुदिराज यांनी सर्व सण आनंदात आणि शांततेत साजरा करण्याची हिंदू संस्कृती आहे. त्या हिंदू संस्कृतीला अनुसरून बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी गौरी गणपती सणासह ईद सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करावा असे आवाहन पो. नि. मुदिराज यांनी केले. तसेच देव, देश आणि धर्म यासाठी आपण सर्वांनी मिळून सातत्याने काम केले पाहिजे. समाज कल्याण अधिकारी मेश्राम मॅडम यांनी यावेळी सांगितले. आरती नंतर पो. नि. अशोक मुदिराज यांचा लोकशाहीचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य व जिल्हाध्यक्ष सहस आदोडे, आत्माराम वाव्हाळ, संजय देवा कुलकर्णी यांनी सत्कार केला. तर मेश्राम मॅडम यांचा सत्कार अँड सुप्रिया गिरी, संध्या सिरसाट यांनी केला. यावेळी लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ, शिवप्रसाद सिरसाट, अविनाश कुलकर्णी सह आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड-प्रतिनिधी बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत आगामी काळात दि. २७ ऑगस्ट २०२५ रोजी श्रीगणेशोत्सव स्थापना दि.०६ सप्टेंबर २०२५ रोजी विसर्जन मिरवणूक, दि. ५ सप्टेंबर २०२५ रोजी ईद-ए मिलाद मिरवणुक असून तसेच राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. ०९ सप्टेंबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील

# माजलगाव शहरात गणराया अवार्ड योजना-डॉ.प्रशांत पाटील

माजलगाव-प्रतिनिधी तालुक्यातील गणेश मंडळांसाठी भारतीय जनता पार्टी व परशुराम हिंदू सेवा संघ यांच्या वतीने गणराया अवार्ड योजना आयोजित करण्यात आली आहे. यात पहिले बक्षीस रु. ११०००/- ट्रॉफी व प्रमाणपत्र, दुसरे बक्षीस रु.७०००/- ट्रॉफी व प्रमाणपत्र, तिसरे बक्षीस रु.५०००/- ट्रॉफी व प्रमाणपत्र दिले जाणार असून उत्तेजनार्थ अजून काही ट्रॉफी दिल्या जाणार आहेत. तरी या योजनेमध्ये माजलगाव तालुक्यातील सर्व गणेश मंडळानी सहभाग घ्यावा असे आवाहन माजलगाव शहर मंडल अध्यक्ष




विनायक रत्नपारखी यांनी केले आहे. यासाठी आयोजकांनी खालील प्रमाणे गुण देण्याचे ठरवलेले आहे. १) पर्यावरण पूरक गणपती = १० गुण, २) स्वदेशी विषयी जनजागृती सजावट / देखावे = ४० गुण, ३) ऑपरेशन सिंदूर विषयी देखावे / सजावट = ३० गुण, रक्तदान शिबीर / वैद्यकीय सेवा शिबीर २० गुण असे गुण देण्यात येणार आहेत. यासाठी पोलीस स्टेशनची परवानगी काढलेले व डी जे मुक्त मिरवणूक काढणारे गणेश मंडळ पात्र असतील. तरी माजलगाव तालुक्यातील सर्व गणेश मंडळानी गणेश उत्सवानिमित्त दहा दिवसांमध्ये घेतलेले वरील गुणांकाचे व वेगवेगळे कार्यक्रम / उपक्रम आम्हाला कळवावेत किंवा ९९२२२२४०३८ या नंबर वर टाकावेत असे आवाहन केले आहे. ज्या गणेश मंडळाला जास्त गुण मिळतील त्या गणेश मंडळास पहिले, दुसरे, तिसरे व उत्तेजनार्थ बक्षीस दिली जाणार आहेत. या कार्यक्रमासाठी भाजपा चे माजलगाव शहर सरचिटणीस पवन मोगरेकर, भाजपा माजलगाव शहर उपाध्यक्ष अविनाश कांडुरे व भाजपा पदाधिकारी नामदेव मुळे हे परीक्षण करत आहेत. गणेश विसर्जनानंतर लवकरच गणराया अवॉर्ड योजनेचे बक्षीस एक छान सा कार्यक्रम घेऊन सर्व विजेत्यांना दिले जाईल असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य, परशुराम हिंदू सेवा संघांचे प्रदेश संघटन सरचिटणीस तथा सिद्धीविनायक अर्बन चे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील यांनी केले आहे

# सेवा पंधरवडा : जनतेच्या समस्या सोडवण्याचा लोकाभिमुख उपक्रम

. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनांक २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्यभर सेवा पंधरवडा ङ्ग राबवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे . महसूल व वन विभागाच्या माध्यमातून हा उपक्रम राबवण्यात येणार असून यामध्ये सामान्य जनतेच्या दैनंदिन समस्या , शेतकऱ्यांच्या अडचणी आणि नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी विशेष मोहीमा राबवल्या जाणार आहेत .

जनतेच्या हिताचा विचार करणारा शासन निर्णय म्हणजेच लोकाभिमुख प्रशासन . याच धर्तीवर शासनाने तीन टप्प्यांमध्ये हा उपक्रम उभारला आहे . पहिला टप्पा – पाणंद रस्ते विषयक मोहीम – शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत जाणाऱ्या पाणंद रस्त्यांचे संरक्षण , नोंद नसलेल्या रस्त्यांची नोंद घेणे , शेतजमिनीपर्यंत रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी सीमांकन , रस्ता अडथळे दूर करणे अशा कामांवर भर दिला जाणार आहे .

पिके लावूनही जर रस्ता नसेल, तर शेतकरी काय करील ?

धान्य द्यायला रस्ता नसेल, तर भाकर कोण शिजवील ?या प्रश्नांची उत्तरे शासनाने या मोहिमेतून शोधण्याचा प्रयत्न केला आहे . दुसरा टप्पा – सर्वांसाठी घरे व पात्रांना पट्टे वाटप : दिनांक २३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबरदरम्यान या टप्प्यात म सर्वांसाठी घरे म या योजनेअंतर्गत राहिवाशांना शासकीय जमिनीवरील नियमित हक्क देणे , झोपडपट्टूयांचे पुनर्वसन , शेतकऱ्यांना पट्टे वाटप , तसेच गरजूंना कायमस्वरूपी मालकीचा अधिकार देण्याचे काम केले जाणार आहे .

घर हेच सुखाचं मूळ,
घराशिवाय संसार कसा फुल ?शेतकऱ्याला जमीन, नागरिकाला घर,
यातूनच दिसेल समृद्धीचा दरबार !



तिसरा टप्पा – नावीण्यपूर्ण उपक्रम – दिनांक २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान जिल्हाधिकारी स्थानिक समस्यांवर उपाययोजना राबवतील . पाणी , जमीन , आरोग्य , शिक्षण यासंबंधी जिल्ह्यातील स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासन पुढाकार घेईल . यातूनच शासनाचा लोकाभिमुखता चा चेहरा अधिक स्पष्ट होईल .हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे . कारण पाणंद रस्त्यांची समस्या वर्षानुवर्षे शेतकरी अनुभवत आहेत . शेतमाल बाजारात पोचवण्यासाठी रस्त्यांची सुविधा हा शेतकऱ्यांचा मुलभूत अधिकार आहे . घर आणि जमिनीवरील हक्क ही तर प्रत्येक नागरिकाची गरज आहे . शासनाने या उपक्रमातून त्या समस्या दूर करण्याचे वचन दिले आहे .बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे – सोनवणे, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, अधीक्षक भूमी अभिलेख तसेच उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्या प्रयत्नातून नागरिकांच्या तक्रारी व अडचणी तातडीने सोडवण्याचे काम सुरू आहे . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनीही पुढाकार घेऊन वादग्रस्त रस्ते मोकळे करणे , सस्ती अदालतांचे आयोजन करणे आणि नागरिकांना प्रत्यक्ष न्याय देणे अशा अनेक उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवला आहे .

मागील शासन निर्णयांचा संदर्भ घेतल्यास , ग्रामविकास विभागाचा दिनांक १६.०२.२०१८ चा निर्णय , नगरविकास विभागाचा दिनांक ११.०९.२०१८ चा निर्णय , तसेच महसूल विभागाचे १९९६ पासूनचे विविध निर्णय हे सर्व या उपक्रमाशी जोडले गेले आहेत . म्हणजेच, हा उपक्रम केवळ औपचारिक नसून, आधीच्या निर्णयांना नवा गतीमान वेग देणारा आहे .

रस्ता मिळाला, तर पिके बाजारात पोहोचतील ,घर मिळालं, तर संसार उजळून निघेल ,
हक्क मिळाला, तर न्याय अनुभवता येईल ,सेवा पंधरवडा जनतेचा दीप उजळवेल !

या उपक्रमात स्थानिक लोकप्रतिनिधी, पंचायत समिती , ग्रामपंचायत सदस्य , शेतकरी , नागरिक सर्वांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे . म्हणूनच सेवा पंधरवडा हा केवळ उपक्रम नाही , तर तो जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी शासनाचा संकल्प आहे . छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या माध्यमातून सुरू झालेला हा लोकाभिमुख प्रवास राज्यातील शेतकरी व नागरिकांसाठी नवा आशेचा किरण ठरेल यात शंका नाही .

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# बार्शी नाक्याजवळ दुचाकीची समोरा समोर धडक, दुचाकीस्वार गंभीर जखमी.

## बांधकाम विभाग,साकेत कंट्रक्शनचा गलथान कारभार आणखी किती बळी घेणार?

बीड(प्रतिनिधी)बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते बार्शी नाका तेलगाव नाका चौक रस्त्याचे काम संत गतीने सुरू असल्याने या रस्त्यावर रोजच अपघात होत आहे.

दोन दिवसापूर्वीच रात्री याच ठिकाणी एका व्यक्तीस चार चाकी मालवाहू वाहनाने उडवल्याने जागीच मृत्यू झाला होता, तर दहा दिवसांपूर्वी दुचाकीवर जाणाऱ्या इसमास क्रेन ने धडक दिल्याने दुचाकी सोबत जागीच ठार झाले होते, एक महिन्यापूर्वी तेलगाव नाका चौका मध्ये टेम्पो ने एका तरुणास उडवल्याने तरुण जागीच ठार झाला होता. अपघाताची मालिका दररोज सुरूच असून याकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष असल्यानेच व वाहतूक एका बाजूने सुरू असल्याचेच अपघात होत असल्याच्या तक्रारीत वाढ होत आहे.

साकेत कंट्रक्शन व बांधकाम विभागाच्या गलथान कारभारामुळे पुन्हा एकदा गंभीर अपघात घडला आहे. सोमवारी सायंकाळी आठ वाजण्याच्या सुमारास दोन दुचाकींचा समोरासमोर भीषण अपघात झाला. या अपघातात दोन्ही दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले असून त्यांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे.



. बार्शी रोडवरील रस्त्याचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू आहे,अर्धवट सिमेंट कॉंक्रीट, वाहतुकीसाठी कोणतेही सूचना फलक किंवा सुरक्षा व्यवस्था नसल्याने वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. तसेच वाहतूक एकाच बाजूने सुरु असल्याने वारंवार अपघात घडत असून नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. अपघातानंतर घटनास्थळी मोठी गर्दी झाली. नागरिकांनी तातडीने जखमीं रुग्णालयात दाखल केले. यावेळी नागरिकांनी बांधकाम विभागाविरोधात संताप व्यक्त केला. “कामाच्या नावाखाली जीव धोक्यात घालणारे रस्ते देणे म्हणजे जनतेशी केलेला थेट विश्वासघात आहे,” असे मत स्थानिकांनी व्यक्त केले.

नागरिकांचे म्हणणे आहे की, काम वेळेत पूर्ण होत नाही, तसेच कोणतीही सुरक्षा खबरदारी घेतली जात नाही. वारंवार अपघात होऊनही बांधकाम विभागाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून सुरक्षित वाहतुकीसाठी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी स्थानिकांनी प्रशासनाकडे केली आहे. अपघातात जखमी झालेल्याची नावे अद्याप समजू शकली नसून लवकर सविस्तर वृत्त देण्यात येईल.

# चलो मुंबई गरजवंत मराठ्यांचा लढा - मनोज जारंगे

रामेश्वर तांगडे प्रतिनिधी जांब समर्थ/२९ ऑगस्ट २०२५ रोजी मनोज दादा जरांगे पाटील यांनी अहिंसेच्या मार्गाने गरजवंत मराठ्यांच्या आरक्षणासाठी मुंबई येथे लोकशाही मार्गाने आरक्षणाचे रणशिंग फुंकले आहे. त्यामध्ये महाराष्ट्र



राज्यातील कोट्यावधी गरजवंत मराठे एक वाटले आहे. आपल्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या मराठे बांधवांना म हाराष्ट्रातील विविध गावातून मधु करी म गून दररोज मुंबई येथे समाज बांधवांना ठेचा, शेंगदाण्याची भुरकी, लोणचं, भाकरी, उदरनिर्वाह करता पाठवीत आहेत. याच प्रकारे आज दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रविवार रोजी समर्थ रामदास स्वामी यांची जन्मभूमी येथून भाकरी, ठेचा, शेंगदाण्याची भुरकी या प्रकारे उदरनिर्वाह करण्यासाठी एक पिकअप घेऊन मराठे स्वयंसेवक मुंबईकडे रवाना झाले आहेत.



मराठा आरक्षणासाठी मुंबईत आंदोलन करणाऱ्या मराठा समाज बांधवांसाठी राज्याच्या विविध भागातून मदतीचा ओघ सुरू झाला आहे. आंदोलकांना खाण्यापिण्याची गैरसोय होऊ नये म्हणून अनेक जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणात अन्नसामग्री, पाणी आणि इतर आवश्यक वस्तू पाठवल्या जात आहेत. मराठवाड्यातील बीडमध नांदेड, चाळीसगाव, बीड, संभाजीनगर, पैठण आणि शिर्डीतून मदतीचा हात दिला जात आहे. यात अनेक गावागावातून भाकरी, ठेचा यांसारखे पदार्थ शिदोरी म्हणून दिले जात आहेत.



बीड शहरातील एकनाथ नगर येथील भक्ती कंट्रक्शन गणेश मंडळाची श्री ची आरती करताना भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष माजी नगरपालिका अमोल बारस्कर सभापती नवनाथ शिराळे पाटील अमोल बारस्कर भालेकर साहेब इत्यादी गणेश भक्त व मंडळाचे सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते

# डॉ.मुजाहिद मोमिन यांनी दाखवला धाडसाचा आदर्श, बाप-लेकीचा वाचवला

बीड। प्रतिनिधी पाली येथील तलावाजवळ रविवारी एक हृदयद्रावक प्रसंग घडला. अज़ीज़पुरा येथील एक कुटुंब सेल्फी घेत असताना अचानक १२ वर्षांची मुलगी पाय घसरून पाण्यात पडली. तिला वाचवण्यासाठी धाव घेतलेल्या वडिलांचाही तोल जाऊन तेही पाण्यात पडले. बाप-लेकी दोघेही बुडण्याच्या स्थितीत असताना उपस्थित नागरिकांनी मदत करण्याऐवजी तिथून पळ काढला. या जीवघेण्या प्रसंगी डॉ. मुजाहिद मोमिन यांनी धाडस दाखवत जीव धोक्यात घालून पाण्यात उडी घेतली व बाप-लेकींचे प्राण वाचवले. त्यांच्या या धाडसी कार्यामुळे अत्तार



फाऊंडेशन महाराष्ट्र (बीड) यांच्या तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. अल्लाहच्या कृपेने दोन जिवांना नवे जीवनदान मिळाले. डॉ. मोमिन यांच्या या शौर्यपूर्ण कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. खऱ्या अर्थाने मर्दानगी, धैर्य आणि इंसानियत याचे जिवंत उदाहरण.

याप्रसंगी पालीच्या तलावाकडे फिरायला जाणाऱ्यांनी सतर्क राहावे, सेल्फी काढणे टाळावे, नागरिकांनी जीव धोक्यात घालू नये तसेच अशा गर्दीच्या ठिकाणी कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त ठेवण्याची मागणी अत्तार फाऊंडेशन महाराष्ट्र यांच्या कडून करण्यात येत आहे. या धाडशी कार्याबद्दल डॉ.मुजाहिद सर यांचा अत्तार फाउंड ेशनच्या वतीने सत्कार करण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष इम्रान अत्तार, सचिव फेरोज सर, उपाध्यक्ष समीर अत्तार सर, संघटक रफिक अत्तार,कोषाध्यक्ष मुक्तार अत्तार.

# जगात खळबळ! पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट सुनावले, म्हणाले, अशाने विश्वासार्हता कमी...

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे चीनमधील 31 व्या एससीओ शिखर संमेलनात सहभागी झाले आहेत. यावेळी बैठकीसाठी नरेंद्र मोदी आणि पुतिन हे दोघेच एकाच गाडीमध्ये रवाना झाले. या फोटोने जगात मोठी खळबळ उडालीये. रशियाकडून भारताने तेल खरेदी करू नये, याकरिता अमेरिका सतत दबाव टाकत असताना पुतिन आणि मोदी यांनी एकाच गाडीतून थेट प्रवास केला. या संमेलनातून पाकिस्तानवरही निशाणा साधताना थेट नरेंद्र मोदी हे दिसले आहेत. दहशतवादाबद्दल बोलताना ते दिसले.

संमेलनात नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानबद्दल परखड मत मांडले. नरेंद्र मोदी यांनी म्हटले की, जेव्हा एखाद्या देशाच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन होते तेव्हा एखादे नाते जोडणे याचा अर्थ आणि विश्वासार्हता कमी होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी CPEC चे नाव घेणे टाळले. मात्र, त्यांच्या निशाण्यावर CPEC च होती. मुळात म्हणजे आता एससीओ संमेलनात काही समीकरणे बदलताना दिसली आहेत. सुरूवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहलगामवरील हल्ल्याबाबत भाष्य केले तर दुसरीकडे दहशतवाद्याच्याविरोधात कडक आणि रणनीती आखण्यासाठी घोषणा पत्र दिले. त्यांनी पहलगाममधील हल्ल्याचा कडक शब्दात निषेध केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले की, मी सर्वात अगोदर सर्व मित्र देशांचे धन्यवाद देतो की, ज्यांनी पहलगाम हल्ल्यानंतर त्याचा विरोध केला आणि आमच्या वाईट काळात सोबत उभे राहिले. एक प्रश्न आहे की, काही लोक थेट पणे दहशतवादाचे समर्थन करत आहेत, त्याचा आपण स्वीकार करतो? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले की, दहशतवादाच्या



विरोधात आपण सर्वांनीच एकत्र यायला पाहिजे.

जर आपण दहशतवादाला प्रोत्साहन दिले तर कोणताही देश आणि समाज सुरक्षित राहू शकत नाही. यासोबतच त्यांनी चीनला संदेश देत स्पष्ट केले की, दहशतवादावर ते दुटप्पी भूमिका घेऊ शकत नाहीत. कारण दहशतवादावर भारताबद्दल चीनचे वागणे दरवेळी वेगळे असते. यामुळे विश्वास उडतो, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. थेट चीनच्या भूमीवर जाऊन त्यांना सुनावताना नरेंद्र मोदी हे दिसले आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
मंगळवार २ सप्टेंबर २०२५
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

मनोज जरांगे पाटील मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करत आहेत. आज या आंदोलनाचा चौथा दिवस आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे अशी जरांगे पाटलांची मागणी आहे. आज या आंदोलनाच्या विरोधात हायकोर्टात सुनावणी पार पडली. यावेळी याचिकाकर्त्यांनी आंदोलन नियम मोडत असल्याचे म्हटलं. त्यामुळे कोर्टाने आंदोलकांना नियम पाळण्याची सूचना केली आहे. यानंतर आता मनोज जरांगे पांटलांनी आंदोलकांना नियम न मोडण्याची विनंती केली आहे. ते नेमकं काय म्हणाले ते जाणून घेऊयात.

# तुमच्यामुळे माझी जात हरू नये माझी तुम्हाला शेवटची विनंती,

## मनोज जरांगे पाटलांचे आंदोलकांना आवाहन



### आपल्याला न्यायालयाच्या आदेशाचे पालन करायचे आहे - जरांगे पाटील

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ‘आपल्याला न्यायालयाच्या आदेशाचे पालन करायचे आहे. आपल्याला शेजारी एक मैदान मोकळं करून दिलं आहे. तिथे गाड्या लावा आणि मैदानावर झोपा. तुम्हाला आरक्षण पाहिजे नसेल तर तुम्ही गावाकडे जाऊ शकता. मला किती त्रास होत आहे हे तुम्हाला माहिती नाही. तुमच्या लेकराबाळांसाठी मी कष्ट सहन करत आहे. आरक्षण देऊन लेकरांच्या पिढ्यांचा उद्धार करायचा आहे. मला माझी जात मोठी करायची आहे.